विकास व कल्याण

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ,मुंबई.**
**एम.एम.टी.सी. हाऊस, पाचवा मजला, प्लॉट नं. सी २२,**
**ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१ .**

**मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री, (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६५ व्या बैठकीचे इतिवृत्त**

*******

**बैठक स्थळ :- मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००२.**

**दिनांक. :- १२.०५.२०२६ (मंगळवार)**

**वेळ :- दुपारी १२:०० वा.**

---

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६५ वी बैठक मंगळवार, दि. १२.०५.२०२६ रोजी संध्याकाळी १२:०० वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीची विषय सूची खालीलप्रमाणे आहे.:-

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांकरीता योजनांची अंमलबजावणी करणे. | ०१ ते २१ |
| ०२. | मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय | २१ ते २१ |

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मंगळवार दिनांक १२.०५.२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता संपन्न झालेल्या ६५ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. ना. श्री. आकाश फुंडकर, मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६५ वी बैठक मंगळवार दिनांक १२.०५.२०२६ रोजी दुपारी १२:०० वा. मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. आकाश फुंडकर | मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्रीम. आय. ए. कुंदन, प्रधान सचिव (कामगार) | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. दिपक पोकळे, उप सचिव (कामगार-७) | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. विवेक कुंभार | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य या उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

मंडळ सचिव यांनी नमूद केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (उपकर), १९९६ लागू केला आहे.त्याअनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले आहेत. सदर नियमांच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत

व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजना बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येत आहेत.

मंडळ सचिव यांनी नमूद केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (उपकर), १९९६ अन्य कामगार कायद्यासोबत विलीनिकरण करून केंद्र शासनाने एकूण चार कामगार संहिता दिनांक २१ नोव्हेंबर, २०२५ पासून लागू करण्यात आली आहे.

इमारत व इतर बांधकाम बाबत सदरच्या चार संहितेपैकी सामाजिक सुरक्षा संहिता - २०२० लागू होत असून, सदर कामगार संहितेच्या अनुषंगाने, राज्य शासनाने महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२६ दिनांक ०५ मे, २०२६ रोजी प्रसिद्ध केले असून, पंचेचाळीस दिवसानंतर सदरचे नियम अंतिम होत आहेत.सदरचे नियम अंतिम झाल्यानंतर संहिता व नियमामधील तरतूदींच्या अनुषंगाने योजना राबविणे आवश्यक ठरणार आहे.सबब, सदर बैठक सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांकरीता योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता आयोजित केली असल्याचे मंडळ सचिव यांनी नमूद केले व त्यानुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र. ०१:- सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांकरीता योजनांची अंमलबजावणी करणे.**

मंडळ सचिव यांनी नमूद केले की, सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मध्ये मंडळाची कार्ये नमूद केली असून, त्याअनुषंगाने योजनांची अंमलबजावणी करावयाची आहे. सदर कलमातील (a) ते (h) मध्ये विविध योजना नमूद केल्या असून, (i) व (j) नुसार केंद्र शासनाच्या मान्यतेने अन्य योजना राबविता येणार आहेत. सदरच्या तरतूदी खालीलप्रमाणे आहेत :-

(a) provide death and disability benefits to a beneficiary or his dependants;

(b) make payment of pension to the beneficiaries who have completed the age of sixty years;

(c) pay such amount in connection with premium for Group Insurance Scheme of the beneficiaries as may be prescribed by the appropriate Government;

(d) frame educational schemes for the benefit of children of the beneficiaries as may be prescribed by the appropriate Government;

(e) meet such medical expenses for treatment of major ailments of a beneficiary or, such dependant, as may be prescribed by the appropriate Government;

(f) make payment of maternity benefit to the beneficiaries;

(g) frame skill development and awareness schemes for the beneficiaries;

(h) provide transit accommodation or hostel facility to the beneficiaries;

(i) formulation of any other welfare scheme for the building worker beneficiaries by State Government in concurrence with the Central Government; and

(j) make provision and improvement of such other welfare measures and facilities as may be prescribed by the Central Government.

(I) **विचारार्थ प्रस्ताव -**

सामाजिक सुरक्षा संहिता -- २०२० च्या कलम (७) (६) मधील (**a**) च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत मृत्यू सहाय्याकरीता सुरू असलेल्या (अंत्यविधी सहाय्य-रक्कम रू.१०,०००/ एकवेळ - F-०६,वारस सहाय्य - रू.२४,०००/- प्रतिवर्ष पाच वर्षाकरीता - F-०७ व शववाहीनी - प्रत्यक्ष होणारा खर्च - F-०८ ) योजना तसेच, दिव्यांगाकरीता सुरू असलेली कृत्रिम अंग लावणे - प्रत्यक्ष होणारा खर्च - H-०७ ह्या योजना निरसित करून नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना मृत्यू सहाय्य व दिव्यांग सहाय्य योजना लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

२. **नैसर्गिक मृत्यू सहाय्य योजना :-**

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

**(अ) पात्रता निकष**

(i) ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) आहे असे बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) बांधकाम कामगार किमान तीन वर्षे मंडळाकडे नोंदीत असणे आवश्यक राहील.याबाबत स्पष्ट करण्यात येते की,बांधकाम कामगाराच्या नोंदणीचे दोन वर्षे पुर्ण झाली असतील व तिस-या नोंदणी वर्षामध्ये मृत्यू झाल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील. तसेच, तिस-या वर्षाकरीता नोंदणीकरीता अर्ज सादर केला असेल व सदर अर्जावरील अंतिम निर्णयापूर्वीच मृत्यू झाल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील. तीन वर्षे नोंदणीचा कालावधी गृहीत धरताना कोणत्याही वर्षाची नोंदणी गृहीत धरण्यात येईल , याकरीता सलग तीन वर्षे नोंदणी असण्याची आवश्यकता राहणार नाही.

(iii) बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यानंतर एक वर्षाच्या आतमध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहणार नाही.

(iv) सदर योजनेंतर्गत उचित प्राधिकरणाकडून वारस प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.३,५०,०००/- इतके एकवेळचे सहाय्य म्हणून देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(i) बांधकाम कामगाराचे मृत्यू प्रमाणपत्र

(ii) वारस प्रमाणपत्र

(iii) वारसदाराचे आधारकार्ड

(iv) वारसदारांच्या बँक खात्याचा तपशिल

३. **अपघाती मृत्यू सहाय्य योजना :-**

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

**(आ)पात्रता निकष**

(i) ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) आहे असे बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) बांधकाम कामगारने नोंदणीकरीता अर्ज सादर केला असेल व सदर अर्जावरील अंतिम निर्णयापूर्वीच अपघाती मृत्यू झाल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील.

(iii) ज्या ठीकाणी इमारत व इतर बांधकाम सुरू असताना अशा ठीकाणी अपघाताद्वारे झालेल्या मृत्यू करीता सदरची योजना लागू राहील.

(iv) बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यानंतर एक वर्षाच्या आतमध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहणार नाही.

(v) सदर योजनेंतर्गत उचित प्राधिकरणाकडून वारस प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.६,५०,०००/- इतके एकवेळचे सहाय्य म्हणून देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(i) पोलिस प्रथम खबरी अहवाल व पंचनामा

(ii) बांधकाम कामगाराचे मृत्यू प्रमाणपत्र

(iii) वारस प्रमाणपत्र

(v) वारसदाराचे आधारकार्ड

(vi) वारसदारांच्या बँक खात्याचा तपशिल

## ४. <u>दिव्यांग सहाय्य योजना:-</u>

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

(अ) **पात्रता निकष**

(i) ज्या बांधकाम कामगाराने किमान एकवेळ मंडळाकडे नोंदणी केली असेल असे बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) बांधकाम कामगारने नोंदणीकरीता अर्ज सादर केला असेल व सदर अर्जावरील अंतिम निर्णयापूर्वीच त्यास दिव्यांगत्व आल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील.

(iii) मंडळाकडील नोंदणीनंतर आलेल्या दिव्यांगत्वासाठी बांधकाम कामगार सदर योजनेसाठी पात्र राहतील.

(iv) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ७५% असल्यास बांधकाम कामगार सदर योजनेसाठी पात्र राहतील.

(v) बांधकाम कामगारास दिव्यांगत्व प्रमाणपत्र प्राप्त एक वर्षाच्या आतमध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहणार नाही.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.२,००,०००/- इतके एकवेळचे सहाय्य देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(i) ७५% दिव्यांगत्व असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र

५. सध्या मंडळाकडून सुरू असलेल्या F-०१, F-०२ व H-०४ या योजनेच्या संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

**(II) विचारार्थ प्रस्ताव –**

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मधील **(b)** च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

**१.** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांनी त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर, दरवर्षी रक्कम रू.१२,०००/- इतके निवृत्तीवेतन अदा करण्याबाबत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

**२. निवृत्तीवेतन योजनेचे पात्रता निकष :-**

(अ) वयाची ६० वर्षे पुर्ण केलेली व मंडळाकडे सलग किमान १० वर्ष नोंदित असलेले सर्व बांधकाम कामगार सदर योजनेअंतर्गत पात्र राहतील. तसेच त्याच्या कुटुंबातील पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार असतील तर ते स्वतंत्रपणे पात्र राहतील.

(ब) पती/पत्नी च्या मृत्यूनंतर संबधित बांधकाम कामगाराचे पती/पत्नी निवृत्तीवेतनाकरिता पात्र राहतील. तथापि, पती/पत्नी सदर योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळत असेल तर संबधितास दुबार निवृत्तीवेतनाचा लाभ मिळणार नाही.

(क) केंद्र शासनाच्या आदर्श कल्याणकारी योजनांच्या मार्गदर्शक तत्वानुसार, कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ (Employees State Insurance Act, १९४८) व कर्मचाऱ्यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act, १९५२) अंतर्गत लाभ प्राप्त करणारे बांधकाम कामगार निवृत्तीवेतनास पात्र राहणार नाहीत.

**३. निवृत्तीवेतनाचे निकष आणि प्रमाण/दर :-**

(अ) मंडळाकडे नोंदित पात्र बांधकाम कामगारांना त्यांच्या मंडळाकडील नोंदणीच्या कालावधीनुसार निवृत्तीवेतन अदा करण्यात येईल.

(ब) मंडळाकडे नोंदणी असलेल्या वर्षानुसार निवृत्तीवेतनाचे प्रमाण/दर खालीलप्रमाणे राहील :-

| **अ.क्र.** | **मंडळाकडे नोंदणीची एकूण वर्षे** | **दरवर्षी मिळणारे निवृत्तीवेतन** (रू.) |
|---|---|---|
| १ | १० वर्षे | ५०% (रू.६,०००/-) |
| २ | १५ वर्षे | ७५%(रू.९,०००/-) |
| ३ | २० वर्षे | १००% (रू.१२,०००/-) |

(क) मंडळाकडे जमा होणाऱ्या कामगार उपकराचा वेळोवेळी आढावा घेवून, सदर योजनेअंतर्गत देय निवृत्तीवेतनामध्ये कमी अथवा वाढ करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे याबाबत निर्णय मंडळ मान्यतेअंती शासन स्तरावर घेतला जाईल.

४. **निवृत्तीवेतन लाभ मंजूर करण्याची कार्यपद्धती :-**

(अ) सदर योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगाराने https://mahabocw.in/ या मंडळ अधिकृत संकेतस्थळावरील विहित नमुना अर्ज विनामूल्य प्राप्त (Download) करून घ्यावा. (अर्जाचा नमूना **"प्रपत्र-अ"** प्रमाणे)

(ब) सदरचा अर्ज पूर्णपणे भरून पात्र नोंदीत बांधकाम कामगाराने त्याचे आधार कार्ड ज्या जिल्ह्यामधील आहे त्या जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्राचे (WFC) प्रभारी (कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी) यांच्याकडे जमा करावा.

(क) निवृत्तीवेतन अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत :-

१. पत्त्याचा पुरावा-आधार कार्ड साक्षांकित छायाप्रत

२. जन्मतारखेचा पुरावा-जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला साक्षांकित छायाप्रत

३. बँक खाते पासबुक साक्षांकित छायाप्रत

(ड) संबधित प्रभारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र यांनी सदर अर्जाची छानणी करून **"निवृत्तीवेतन शिफारस प्रमाणपत्र"** (प्रपत्र-ब) सह प्रस्ताव मंडळ मुख्यालयास मान्यतेस सादर करावा. एकापेक्षा जास्त जिल्ह्यामध्ये नोंदणी/नुतनीकरणाचा कालावधी असल्यास संबधित जिह्यामधून **"वर्षनिहाय नोंदणी प्रमाणपत्र"** (प्रपत्र-क) संबधित प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्र यांनी प्राप्त करून घ्यावे.

(इ) मंडळ स्तरावर सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेअंती संबधित बांधकाम कामगारास **"निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र"** देण्यात येईल. (प्रपत्र-ड)

(ई) निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक हा संबधित बांधकाम कामगाराचा निवृत्तीवेतन दिनांक समजण्यात येईल व त्यानुसार वर्ष गणना करण्यात येईल.

(क) दरवर्षी माहे नोव्हेंबर मध्ये मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगारास त्याच्या हयातीचा दाखला(प्रपत्र-इ) पुरावा स्वरूपात मंडळाकडे सादर करावा लागेल त्यासाठी त्याने आधारकार्ड/मंडळाचे नोंदणी कार्ड व निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्रासह संबंधित जिल्हा कामगार सुविधा केंद्रामध्ये समक्ष उपस्थित राहून जिल्ह्याचे प्रभारी अधिका-यांकडून हयातीचा दाखला प्राप्त करून द्यावा.जेणेकरून, त्या वर्षीचे निवृत्तीवेतन त्याच्या खात्यात जमा करता येईल.

(ख) मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगारास त्याचे बँक खाते बदलावयाचे असल्यास तसा अर्ज त्यास प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

(ग) मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास, त्याचा/तीचा वारसदार पती/पत्नीने वारस नोंदीचा अर्ज प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

(घ) सदर निवृत्तीवेतन क्रमांकाची नोंद एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) या प्रणालीवर घेण्यात येईल व दरमहा संबधित निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगाराच्या खात्यावर निवृत्तीवेतन जमा करण्यात येईल.

**५. मासिक निवृत्ती वेतन प्रदानाची कार्यवाही :-**

मंडळ मुख्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या **"निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्रांचे आधारे"** प्रत्येक महीन्याच्या शेवटच्या आठवडयात त्यामहिन्याच्या १५ तारखेअखेर निर्गत निवृत्तीवेतन क्रमांक धारकांची मंडळ मुख्यालय स्तरावरील IWBMS प्रणालीचे व्यवस्थापक- मे.आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. यांचेकडून पुढील महिन्याच्या प्रदानार्थ निवृत्तीवेतन धारकांची प्रदान फाईल (Claim disbursement File) बँकेस आवश्यक नमून्यात तयार करण्यात येईल, सदर फाईल तयार करताना त्यामध्ये निवृत्ती वेतन धारकांचे बँक तपशील, व्दिरूक्ती इ.बाबींच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येईल, सदर प्रदान फाईल मंडळाच्या लेखा शाखेस सादर होईल. लेखा शाखेच्या संबंधित कार्यासनाने सदर फाईलची आवश्यक तपासणी करून सदर प्रदान फाईल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अंतिम मान्यतेस्तव सादर करावी. सदर मान्यतेअंती प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबधित पात्र निवृत्तीवेतन धारक बांधकाम कामगारांच्या बँक खात्यावर DBT in Cash प्रकाराने निवृत्ती वेतन जमा करण्यासाठी बँकेस पाठविण्यात यावी. लेखा शाखेने बँकेकडून वेळोवेळी यशस्वी /अयशस्वी प्रदानांचा ताळमेळ घ्यावा. अयशस्वी प्रदानाची स्वतंत्र प्रदान फाईल करण्यात यावी. व प्रत्येक महिन्याचा मासिक प्रगती अहवाल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावा.

**६. मंडळ मुख्यालय स्तरावरील निवृत्तीवेतन समन्वय कक्ष :-**

उपरोक्त प्रमाणे कामकाजाचे समन्वय करण्याकरिता खालीलप्रमाणे समन्वय कक्ष गठीत करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **अधिकारी** | **पद** |
|---|---|---|
| १ | जिल्हा कार्यकारी अधिकारी | कक्ष प्रमुख |
| २ | लेखाधिकारी | समन्वयक |
| ३ | संबंधित जिल्हयाचे जिल्हा कार्यालय प्रमुख | सदस्य |
| ४ | आयडब्ल्यूबीएमएस प्रणालीचे व्यवस्थापक संस्था मे.आरसीएस इन्फोटेक लिमिटेड यांचेकडील प्रकल्प संचालक | सदस्य |

**(III) विचारार्थ प्रस्ताव –**

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मधील **(d)** च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना खालीलप्रमाणे शैक्षणिक सहाय्य योजना लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

(१) इयत्ता नववी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना

(२) इयत्ता अकरावी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना

(३) वैद्यकीय पदवी सहाय्य योजना

(४) अभियांत्रिकी पदवी सहाय्य योजना

(५)निवासी सैनिक शाळांमधील शिक्षणाकरीता सहाय्य योजना

(६) परदेशात पदव्यत्तर पदवी व पी.एच.डी. सहाय्य योजना

(७) मुलभूत वस्तू संच (Basic Item Kit) सहाय्य योजना

२. **इयत्ता नववी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना :-**

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

**(इ) पात्रता निकष**

(vi) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(vii) पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(viii) यापूर्वी मंडळाच्या E-०१ (इयत्ता पहिले ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी साठी सहाय्य) योजनेचा पाल्याकरीता लाभ घेतला असल्यास, सदरचा पाल्य लाभाकरीता अपात्र राहील

(ix) ज्या दिनांकास पाल्य नववी उत्तीर्ण झाला असेल (गुणपत्रिकेवरील दिनांक) त्यापासून एक वर्षाच्या आतमध्ये लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. तद्नंतरचा अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.२०,०००/- प्रति पाल्य सहाय्य बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(vii) पाल्याचे आधार ओळखपत्र

(viii) पाल्याचे नववी मधील शाळेचे ओळखपत्र

(ix) पाल्याचे नववी मध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका

३. **इयत्ता अकरावी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना:-**

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

**(अ) पात्रता निकष**

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

**(ii)** पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

**(iii)** यापूर्वी मंडळाच्या E-०१ (इयत्ता पहिले ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी साठी सहाय्य) E-०२ (इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावी मध्ये किमान ५०% गुण प्राप्त साठी सहाय्य) व E-०३ (इयत्ता अकरावी ते बारावी साठी सहाय्य) योजनेचा पाल्याकरीता लाभ घेतला असल्यास, सदरचा पाल्य लाभाकरीता अपात्र राहील

**(iv)** ज्या दिनांकास पाल्य अकरावी उत्तीर्ण झाला असेल (गुणपत्रिकेवरील दिनांक) त्यापासून एक वर्षाच्या आतमध्ये लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. तद्नंतरचा अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.२५,०००/- प्रति पाल्य बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये सहाय्य देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे अकरावी मधील शाळेचे ओळखपत्र

**(iii)** पाल्याचे अकरावी मध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका

**४. <u>वैद्यकीय पदवी सहाय्य योजना:-</u>**

वैद्यकीय क्षेत्रामधील कोणत्याही पदवीकरीता कोणत्याही शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्यांकरीता सहाय्य म्हणून सदरची योजना खालीलप्रमाणे राबविली जाईल

**(अ)पात्रता निकष**

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) बांधकाम कामगाराचा पती / पत्नी सदर योजनेस पात्र राहणार नाही.

(iii) पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iv) पदवीच्या कोणत्याही शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झाल्यानंतर त्या उत्तीर्ण वर्षाच्या सहाय्याकरीता पाल्य पात्र राहील.

(v) वैद्यकीय क्षेत्रामधील पदविका/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास सदरची योजना लागू राहणार नाही.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.१,००,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये सहाय्य देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे पदवी करीत असलेल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र

(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र

(iv) उत्तीर्ण वर्षाची गुणपत्रिका

५. **<u>अभियांत्रिकी पदवी सहाय्य योजना:-</u>**

अभियांत्रिकी क्षेत्रामधील कोणत्याही पदवीकरीता कोणत्याही शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्यांकरीता सहाय्य म्हणून सदरची योजना खालीलप्रमाणे राबविली जाईल

**(आ) पात्रता निकष**

(vi) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(vii) बांधकाम कामगाराचा पती / पत्नी सदर योजनेस पात्र राहणार नाही.

(viii) पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(ix) पदवीच्या कोणत्याही शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झाल्यानंतर त्या उत्तीर्ण वर्षाच्या सहाय्याकरीता पाल्य पात्र राहील.

(x) अभियांत्रिकी क्षेत्रामधील पदविका/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास सदरची योजना लागू राहणार नाही.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम रू. ६०,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये सहाय्य देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे पदवी करीत असलेल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र

(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र

(iv) उत्तीर्ण वर्षाची गुणपत्रिका

६. **<u>निवासी सैनिक शाळांमधील शिक्षणाकरीता सहाय्य योजना:-</u>**

निवासी सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेणा-या बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येईल.

(i) *<u>केंद्रीय संरक्षण मंत्रालय अंतर्गतच्या सैनिक शाळा</u>*

**(अ)पात्रता निकष**

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iii) कोणत्याही शैक्षणिक वर्षात असताना लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील.शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण करून अथवा कोणत्याही कारणास्तव निवासी सैनिक शाळा सोडल्यानंतर पाल्य लाभास पात्र राहणार नाही.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत पाल्य ज्या शैक्षणिक वर्षात असेल त्या शैक्षणिक वर्षापासून पाल्याच्या दर वर्षीच्या अभ्यासक्रम शुल्काची (Tution Fee) पूर्ण प्रतिपूर्ती करण्यात येईल. तथापि, याकरीता दरवर्षी अर्ज करणे आवश्यक राहील.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे निवासी सैनिक शाळेचे ओळखपत्र

(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र

*(ii) शासन मान्यता प्राप्त अनुदानित व विना-अनुदानित सैनिक शाळा*

**(अ)पात्रता निकष**

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iii) कोणत्याही शैक्षणिक वर्षात असताना लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण करून अथवा कोणत्याही कारणास्तव निवासी सैनिक शाळा सोडल्यानंतर पाल्य लाभास पात्र राहणार नाही.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.१०,०००/- प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे निवासी सैनिक शाळेचे ओळखपत्र

(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र

**७. परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. सहाय्य योजना:-**

दरवर्षी २५ पाल्यांकरीता सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

**(अ)पात्रता निकष**

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iii) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

(i) सदर योजने अंतर्गत अभ्यासक्रम शुल्क (Tuition Fee) हे संबधित विद्यापीठास थेट वर्ग करण्यात येईल

(ii) केंद्र शासनाच्या धोरणानुसार संबधित विद्यार्थ्यास तद्अनुषंगिक भत्ते (Substantial Allowances), प्रवास भत्ता, विमा व इतर शुल्क अदा करण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(x) पाल्याचे आधार ओळखपत्र

(xi) पाल्याचे पदवी महाविद्यालयाचे ओळखपत्र

**(xii)** पाल्याचे पदवी मध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका

**८. मुलभूत वस्तू संच (Basic Item Kit) सहाय्य योजना:-**

इयत्ता पहिले ते इयत्ता आठवी मध्ये शिक्षण घेत असलेल्या बांधकाम कामगारांच्या पाल्यांना मुलभूत वस्तू संच सहाय्याची योजना DBT in Kind पद्धतीने खालीलप्रमाणे राबविण्यात येईल:-

**(अ)पात्रता निकष**

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iii) इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी पर्यंत पाल्य एकवेळ लाभार्थी म्हणून पात्र राहील.तथापि, मुलभूत वस्तू संच मध्ये बदल केल्यानंतर नवीन संचाकरीता पात्र राहील.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम निवश्चित केलेल्या मुलभूत वस्तू संचाची शासनाच्या खरेदी धोरणानुसार खरेदी करून प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे शाळेचे ओळखपत्र

(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र

**(ड) वस्तूंची निवड**

आवश्यक असलेल्या वस्तूंची निवड महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई शासन मान्यतेने अंतिम करेल.

९. सध्या मंडळाकडून सुरू असलेल्या E-०१ E-०२ E-०४ E-०६ E-०७ ह्या योजना बंद करण्यात याव्यात.सध्या मंडळाकडून सुरू असलेल्या E-०३ व E-०५ या योजनेच्या संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

**(IV) विचारार्थ प्रस्ताव –**

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मधील (**f**) च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) महिला बांधकाम कामगारांना प्रसुती सहाय्य योजना लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

२. **प्रसुती सहाय्य योजना :-**

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

**(इ) पात्रता निकष**

(x) नैसर्गिक / शस्त्रक्रियेद्वारे प्रसुती झालेल्या ज्या महिला बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) आहे असे बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(xi) प्रसुती झाल्यानंतर एक वर्षाच्या आतमध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहणार नाही.

(xii) पहिल्या दोन अपत्यांकरीता बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(xiii) प्रसुतीनंतर अपत्याचा मृत्यू झाल्यास प्रसुतीबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्रावर बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

**(ब) वित्तीय सहाय्य:-**

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.२५,०००/- इतके एकवेळचे सहाय्य म्हणून देण्यात येईल.

**(क) आवश्यक कागदपत्रे:-**

(xiii) प्रसुतीनंतर अपत्याचे जन्म नोंदणी दाखला ***अथवा*** प्रसुतीबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र.

३. सध्या मंडळाची बंद असलेल्या H-०१ या योजनेच्या संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

**(V) विचारार्थ प्रस्ताव -**

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मधील (**c**) , (**e**) , (**g**) व (**h**)च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत यापूर्वी राबविल्या जात असलेल्या तथापि, सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या तरतूदीमध्ये समाविष्ट न होणा-या खालील योजना दिनांक ०१ जून, २०२६ पासून बंद करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली:-

१. इयत्ता पहिली ते इयत्ता सातवी (रक्कम रू.२,५००/- प्रतिवर्षी) आणि इयत्ता आठवी (रक्कम रू.५,०००/- प्रतिवर्षी) — **E-०१**

२.इयत्ता दहावी व इयत्ता बारावी ५०% गुण (रक्कम रू.१०,०००/- प्रतिवर्षी) — **E-०२**

३.पदवी करीता सहाय्य (रक्कम रू. २०,०००/- प्रतिवर्षी) — **E-०४**

४.पदविकेकीता सहाय्य (रक्कम रू.२०,०००/- प्रतिवर्षी) व पदव्युत्तर पदवी करीता सहाय्य (रक्कम रू.२५,०००/- प्रतिवर्षी) — **E-०६**

५. संगणक शिक्षणाकरीता सहाय्य (रक्कम रू.५,०००/- एकवेळेस) — **E-०७**

६. पहिल्या मुलीच्या जन्मानंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया (रक्कम रू.१,००,०००/- एकवेळेस) — **H-०३**

७. गृहकर्जाच्या व्याजावर अनुदान (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) — **F-०३**

८. शहरी भागात घर खरेदीसाठी सहाय्य (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) — **F-०४**

९. ग्रामीण भागात घर खरेदीसाठी सहाय्य (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) — **F-०५**

१०. विवाह खर्चाची प्रतिपुर्ती (रक्कम रू.३०,०००/- एकवेळेस) — **S-०१**

११. मुलीच्या विवाहाकरीता सहाय्य (रक्कम रू.५१,०००/- एकवेळेस) — **S-१३**

**२.** सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) मधील **(i)** च्या अनुषंगाने खालील योजना सुरू ठेवण्याबात केंद्र शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत चर्चा करण्यात आली :-

१. सुरक्षा संच (**Saftey Kit** एकवेळेस) पुरवठा करणे — **S-०८**

२. अत्यावश्यक संच (**Essential Kit** एकवेळेस) पुरवठा करणे — **S-०९**

३. गृहपयोगी संच (**Utensil Kit** एकवेळेस) पुरवठा करणे — **S-१४**

**३.** सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) **(c)** मधील गट विमा तरतूदीखालील "प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना", "प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना" व कलम (७) (६) **(e)** मधील वैद्यकीय उपचार तरतूदीखालील "तपासणी ते उपचार" योजना सद्यस्थितीत सुरू ठेवून, सदर योजनांचे पुर्नविलोकन करण्यास अभ्यासगट गठीत करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

**४.** सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) **(g)** नुसार कौशल्य विकास योजना व प्रचार प्रसिद्धी योजनेबाबतचा मसुदा तयार करून शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

५. सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) **(h)** नुसार नव्याने सुरू करावयाच्या "संक्रमण शिबीर / वसतिगृह" या योजनेबाबतचा मसुदा तयार करून शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने अभ्यासगट गठीत करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

## (V) विचारार्थ प्रस्ताव —

योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने खालील बाबींवर चर्चा करण्यात आली :-

१. **वित्तीय तरतूद -**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडे जमा होणा-या कामकार उपकरामधून सदर योजनेवरील खर्च भागविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

२. सदरची योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मार्फत राबविण्याबाबत व सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजना अंमलबजावणीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

उपरोक्त प्रमाणे झालेल्या चचर्चेनुसार सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला :-

**ठराव क्र. ६५ (०१)/२०२६:-**

**सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना नैसर्गिक मृत्यू प्रकरणी रक्कम रू.३,५०,०००/- ,अपघाती मृत्यू प्रकरणी रक्कम रू. ६,५०,०००/- व दिव्यांग प्रकरणी रक्कम रू. २,००,०००/- इतके एकवेळचे सहाय्य देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ठराव क्र. ६५ (०२)/२०२६:-

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्रमांक- इबांका-०३२५/प्र.क्र.४५/कामगार-७, दिनांक २८ मार्च,२०२५ व दिनांक १९ जून,२०२५ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन लागू करण्याबाबत घेतलेला निर्णय कायम करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**ठराव क्र. ६५ (०३)/२०२६:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या सर्व पाल्यांना,**

**(१) इयत्ता नववी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना (रक्कम रू.२०,०००/- प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**(२) इयत्ता अकरावी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना (रक्कम रू.२५,०००/- प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**(३) वैद्यकीय पदवी सहाय्य योजना (रक्कम रू.१,००,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**(४) अभियांत्रिकी पदवी सहाय्य योजना (रक्कम रू.६०,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**(५) निवासी सैनिक शाळांमधील शिक्षणाकरीता सहाय्य योजना –** (i)**केंद्रीय संरक्षण मंत्रालय अंतर्गतच्या सैनिक शाळा (दर वर्षीच्या अभ्यासक्रम शुल्काची** (Tution Fee) **पूर्ण प्रतिपूर्ती),** (ii) **शासन मान्यता प्राप्त अनुदानित व विना-अनुदानित सैनिक शाळा (रक्कम रू.१०,०००/- प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**(६) परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. सहाय्य योजना - अभ्यासक्रम शुल्क** (Tuition Fee) **हे संबधित विद्यापीठास थेट वर्ग करण्यात येईल व केंद्र शासनाच्या धोरणानुसार संबधित विद्यार्थ्यास तद्अनुषंगिक भत्ते** (Substantial Allowances), **प्रवास भत्ता, विमा व इतर शुल्क अदा करण्यात मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**(७) मुलभूत वस्तू संच** (Basic Item Kit) **सहाय्य योजना - इयत्ता पहिले ते इयत्ता आठवी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वस्तूंची निवड मंडळाने शासन मान्यतेने अंतिम केलेल्या मुलभूत वस्तू संच** (Basic Item Kit) **पुरवठा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

**अध्यक्ष**
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**ठराव क्र. ६५ (०४)/२०२६:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) महिला बांधकाम कामगारांना रक्कम रू.२५,०००/- इतके एकवेळचे प्रसुती सहाय्य देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ठराव क्र. ६५ (०५)/२०२६:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत यापूर्वी राबविल्या जात असलेल्या तथापि, सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या तरतूदीमध्ये समाविष्ट न होणा-या खालील योजना महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम – २०२६ लागू होण्याच्या दिनांकापासून पासून बंद करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे :-

१. इयत्ता पहिली ते इयत्ता सातवी (रक्कम रू.२,५००/- प्रतिवर्षी) आणि इयत्ता आठवी (रक्कम रू.५,०००/- प्रतिवर्षी) – E-०१

२.इयत्ता दहावी व इयत्ता बारावी ५०% गुण (रक्कम रू.१०,०००/- प्रतिवर्षी) – E-०२

३.पदवी करीता सहाय्य (रक्कम रू. २०,०००/- प्रतिवर्षी) – E-०४

४.पदविकेकीता सहाय्य (रक्कम रू.२०,०००/- प्रतिवर्षी) व पदव्युत्तर पदवी करीता सहाय्य (रक्कम रू.२५,०००/- प्रतिवर्षी) – E-०६

५. संगणक शिक्षणाकरीता सहाय्य (रक्कम रू.५,०००/- एकवेळेस) – E-०७

६. पहिल्या मुलीच्या जन्मानंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया (रक्कम रू.१,००,०००/- एकवेळेस) – H-०३

७. गृहकर्जाच्या व्याजावर अनुदान (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) – F-०३

८. शहरी भागात घर खरेदीसाठी सहाय्य (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) – F-०४

९. ग्रामीण भागात घर खरेदीसाठी सहाय्य (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) – F-०५

१०. विवाह खर्चाची प्रतिपुर्ती (रक्कम रू.३०,०००/- एकवेळेस) – S-०१

११. मुलीच्या विवाहाकरीता सहाय्य (रक्कम रू.५१,०००/- एकवेळेस) – S-१३

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**ठराव क्र. ६५ (०६)/२०२६:-**

**सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मधील (i) च्या अनुषंगाने खालील योजना सुरू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्याबाबस मान्यता प्रदान करण्यात येत आहे :-**

1. **सुरक्षा संच (Saftey Kit एकवेळेस) पुरवठा करणे – S-०८**
2. **अत्यावश्यक संच (Essential Kit एकवेळेस) पुरवठा करणे – S-०९**
3. **गृहपयोगी संच (Utensil Kit एकवेळेस) पुरवठा करणे – S-१४**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**ठराव क्र. ६५ (०७)/२०२६:-**

**सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) (c) मधील गट विमा तरतूदीखालील "प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना", "प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना" व कलम (७) (६) (e) मधील वैद्यकीय उपचार तरतूदीखालील "तपासणी ते उपचार" योजना सद्यस्थितीत सुरू ठेवून, सदर योजनांचे पुर्नविलोकन करण्यास अभ्यासगट गठीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**ठराव क्र. ६५ (०८)/२०२६:-**

**सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) (g) नुसार कौशल्य विकास योजना व प्रचार प्रसिद्धी योजनेबाबतचा मसुदा तयार करून शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**ठराव क्र. ६५ (०९)/२०२६:-**

**सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) (h) नुसार नव्याने सुरू करावयाच्या "संक्रमण शिबीर / वसतिगृह" या योजनेबाबतचा मसुदा तयार करून शासनास सादर करण्याकरीता अभ्यासगट गठीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**ठराव क्र. ६५ (१०)/२०२६:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडे जमा होणा-या कामकार उपकरामधून सदर योजनेवरील खर्च भागविण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**ठराव क्र. ६५ (११)/२०२६:-**

**सदरच्या योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मार्फत राबविण्याबाबस व सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजना अंमलबजावणीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.**

**विषय क्र. (०२) मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई